07 APR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सकारात्मकता, परिश्रमाने विजयीवीर असा ठसा उमटवा

## अनिल सहस्त्रबुद्धे : शिवाजी विद्यापीठाचा ऑनलाइन दीक्षांत समारंभ : सौरभ पाटील याला 'राष्ट्रपती सुवर्णपदक'





कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ ऑनलाईन पध्दतीने झाला. त्यासाठी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह डावीकडून डॉ. आर. के. कामत, पी. आर. शेवाळे, विलास नांदवडेकर, गजानन पळसे, एस. एस. महाजन, मेघा गुळवणी उपस्थित होत्या. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दीक्षांत समारंभ ऑनलाईन पध्दतीने झाला. त्यामध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पदवीधरांना मार्गदर्शन केले. (छाया : नसीर अत्तार)

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : अनिश्चितता, आव्हाने असलेल्या जीवनात सकारात्मक वृत्तीने यश मिळविण्याची धमक, आत्मविश्वास निर्माण होईपर्यंत आपला शिक्षणाचा प्रवास सुरूच राहतो. अनेक व्यवस्थापनगुरू, अर्थशास्त्रज्ञ हे अस्थिर, अनिश्चित, जटील, संदिग्ध जगाबाबत सांगतात. मात्र, याउलट मी सांगतो की, समर्पित कृती व सकारात्मक दृष्टिकोन, सहकार्य व साहचर्य, ऐक्य व अथक परिश्रम या त्रिसूत्रीच्या जोरावर अस्थिरतेवर मात करून नवपदवीधरांनी विजयीवीर असा ठसा उमटवावा. आपल्या ज्ञानाचा उपयोग वंचित, शोषितांच्या विकासासाठी करावा, असे आवाहन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी मंगळवारी येथे केले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ साध्या आणि ऑनलाइन पद्धतीने पार पडला. त्यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी, तर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातून या समारंभाचे थेट प्रेक्षपण करण्यात आले.

कोरोनाबाबतच्या निर्बंधामुळे यंदा प्रत्यक्षात कोणतीही पदवी या समारंभामध्ये प्रदान करण्यात आली नाही. त्याऐवजी राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता सौरभ पाटील, कुलपती सुवर्णपदक विजेती महेश्वरी गोळे आणि पीएच.डी.धारक बसवराज माळी, अमोल माने, मृणालिनी अहिरे, बलगोंडा पाटील यांची प्रातिनिधिक स्वरूपात नावे जाहीर करण्यात आली.

### सक्रिय भूमिका बजाविण्याची गरज

- उच्च शिक्षणातील प्रवेशाचे प्रमाण ५० टक्क्यांवर नेणे. जगातील आघाडीच्या शंभर शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत भारतातील किमान दहा संस्थांनी स्थान मिळविण्याची जाणीव शिक्षणातील सर्व घटकांनी बाळगून त्या दिशेने सक्रिय भूमिका बजावण्याची गरज असल्याचे प्रा. सहस्त्रबुध्दे यांनी सांगितले.
- अनिल सहस्त्रबुध्दे म्हणाले, पदवीधर झाल्यानंतर आता खऱ्याअर्थाने तुमच्या उच्च शिक्षणाची सुरुवात झाली आहे. माजी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाशी नाते कायम ठेवावे. विद्यापीठाच्या गरजेवेळी मदतीचा हात द्यावा.
- कोरोनामध्ये आरोग्य, शिक्षणासह विविध क्षेत्रातील कामगिरीमुळे आपला देश जगाचा आधारवड बनला.

### रत्नागिरीत अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर व्हावे

रत्नागिरीमध्ये शेतकरी कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी महाविद्यालय होणे आवश्यक आहे. त्याबाबतच्या प्रस्तावाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मंजुरी द्यावी, अशी मागणी मंत्री सामंत यांनी प्रा. सहस्त्रबुध्दे यांच्याकडे केली.

नवीन शैक्षणिक धोरण हे सामाजिक समस्या सोडविण्याचा विद्यार्थिकेंद्रित आहे. त्यात कला, दृष्टिकोनाचा समावेश आहे. या संशोधन, कौशल्य, मानवी मूल्ये, धोरणामुळे शिक्षणातून उच्च दर्जाचे कौशल्य असणारे मनुष्यबळ विकसित होईल. आत्मनिर्भर भारताचे लक्ष्य गाठण्याच्या योग्यवेळी हे धोरण आले आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी रोडमॅप ठरवून विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांनी कार्यरत होणे आवश्यक असल्याचे डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी सांगितले.

पदवी मिळणे ही शिक्षणाची सुरुवात असून शेवट नाही. पदवीधरांनी आपण देशासाठी काय करू शकतो याचा विचार करावा. नोकरी मागणारे होण्याऐवजी रोजगार संधी निर्माण करणारे कसे होता येईल, यादृष्टीने पदवीधरांनी कार्यरत राहावे. प्रांतवाद, जातीभेद करू नये. आत्मनिर्भरतेची सुरुवात स्वत:पासून करावी, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

'नॅक'चे ए-प्लस प्लस मानांकन मिळविणाऱ्या शिवाजी विद्यापीठाला नवीन उपक्रमांसाठी राज्य शासनाकडून आवश्यक ते सहकार्य केले जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, पी. आर. शेवाळे, मेघा गुळवणी, एस. एस. महाजन, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या वार्षिक कामगिरीचा आढावा सादर केला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी पदवीधरांची माहिती दिली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील, तृप्ती करेकट्टी यांनी सूत्रसंचालन केले.

# पदवी पहिली ठरावी, अंतिम नव्हे

## कुलपती कोश्यारी : विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ ऑनलाईन



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात संबोधित करताना कुलपती भगतसिंह कोश्यारी.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

यंदा शिवाजी विद्यापीठाचे ७७ हजार ५४२ विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडत आहेत. मात्र, त्यांच्यासाठी ही पदवी पहिली ठरावी, अंतिम नव्हे. कारण शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांनी संधी मिळेल तितके उच्चशिक्षण घ्यावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज केले.

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या ऑनलाईन दीक्षांत पान ७ वर ▶

पुण्यनगरी

# ज्ञानाचा उपयोग वंचितांच्या उत्थानासाठी करा

## प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे : शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवपदवीधरांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील वंचित, शोषित घटकांच्या उत्थानासाठी करावा, असे आवाहन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे चेअरमन प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून स्नातकांना संबोधित करताना ते बोलत होते. कोविड-



स्नातकांना ऑनलाईन संबोधित करताना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे अध्यक्ष प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे.

*आगामी १५ वर्षांत आपल्याला उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रवेशाचे प्रमाण ५० टक्क्यांच्या पुढे घेऊन जायचे आहे. जगातील आघाडीच्या शंभर शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत भारतातल्या किमान दहा संस्थांना स्थान प्राप्त करायचे आहे आणि त्या बळावर भारताला एक सक्षम, विकसित राष्ट्र म्हणून प्रस्थापित करायचे आहे, याची जाणीव बाळगून त्या दिशेने सक्रिय भूमिका बजावण्याची गरजही सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केली.*

१९ साथीच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पद्धतीने झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलपती तथा महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी होते, तर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या ऑनलाईन कार्यक्रमाचा सुमारे ७ हजार नागरिकांनी लाभ घेतला. कार्यक्रमात ७७ हजार ५४२ स्नातकांना पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका प्रमाणपत्रे व पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आल्या.

प्रा. सहस्त्रबुद्धे म्हणाले, आपल्या जीवनातील एक महत्त्वाचा दिवस आणि आयुष्याच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा आहे. तीव्र स्पर्धेला सामोरे जात आपण या गौरवशाली परंपरेच्या विद्यापीठामध्ये प्रवेश घेतला आणि आपले शैक्षणिक कार्य मोठ्या तन्मयतेने साध्य करण्याचा प्रयत्न केला. कठोर परिश्रम आणि उच्च कोटीची समर्पण वृत्ती या जोरावर आपण आपली पदवी आणि पुरस्कार प्राप्त केले आहेत.

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्याधुनिक संशोधनात अत्यंत सक्रिय आहे. आता या स्पर्धात्मक वातावरणात संशोधनासाठी वित्त पुरवठा प्राप्त करण्याची आपणास अधिक संधी असेल.



कोल्हापूर : दीक्षांत समारंभात विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर आर. के. कामत, पी. आर. शेवाळे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, एस. एस. महाजन आणि डॉ. मेघा गुळवणी.

## जगात विद्यापीठाची कामगिरी : कुलगुरू शिर्के

**कोल्हापूर** : शिक्षण हे जीवनापासून विभक्त करता येऊ शकत नाही. शिक्षणाचे उपयोजन जीवनात आपण कशा पद्धतीने करता यावर आपला भविष्यकाळ अवलंबून आहे. आपली अंगभूत कौशल्ये, आत्मविश्वास आणि सृजनशीलतेच्या बळावर जगातील जवळजवळ सर्व देशांत शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी प्रशंसनीय कामगिरी करत आहेत. विद्यापीठाच्या लौकिकात नवपदवीधारक विद्यार्थ्यांनीही मोलाची भर घालून विद्यापीठाचा लौकिक उंचवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

यावेळी कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रथेप्रमाणे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांच्या नेतृत्वाखाली दीक्षांत मिरवणूक निघाली. यावेळी ती कुलगुरू कार्यालयापासून समारंभ स्थळापर्यंत म्हणजे राजर्षी शाहू सिनेट सभागृहापर्यंत काढण्यात आली. त्यामध्ये कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव यांच्यासह विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता सहभागी झाले.

यावेळी प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी पदव्यांचे वाचन केले. धैर्यशील यादव आणि नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी व्यासपीठावर आर. के. कामत, एस. एस. महाजन, पी. आर. शेवाळे, मेघा गुळवणी उपस्थित होते.

### शिक्षण निरंतर प्रक्रिया : कुलपती भगतसिंह कोश्यारी

स्नातकांसाठी ही पदवी पहिली ठरावी, अंतिम नव्हे! कारण शिक्षण ही निरंतर प्रक्रिया आहे आणि विद्यार्थ्यांनी संधी मिळेल तितके उच्च शिक्षण घ्यावे, असे आवाहन राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी केले.



कोश्यारी म्हणाले, शिक्षणाची पुढची पायरी म्हणजे ज्ञान संपादन असते. ज्ञानाचा वापर आपण आपल्या भोवतालचे कल्याण करण्यासाठी करणे आवश्यक आहे. सध्या आपण सारे प्रांतवाद आणि जातिभेदाने घेरले जातो आहोत. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद यांची आपण नावे घेतो; मात्र त्यांचे विचार अंमलात आणत नाही, हे खेदजनक आहे.

### शासन विद्यापीठासमवेत : मंत्री उदय सामंत

महाराष्ट्र शासन विद्यार्थीहिताच्या उपक्रमांसाठी शिवाजी विद्यापीठासमवेत असल्याचे सांगून राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी असल्याचा मला अभिमान आहे. शिवाजी विद्यापीठाने आपल्या कार्यक्षेत्रालगतच्या सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्थानासाठी प्रयत्न चालविले आहेत. अलीकडेच विद्यापीठातर्फे सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठाने मोठा पुढाकार घेतला, ही अभिनंदनीय बाब आहे. तसेच कोरोना काळात विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले, ही बाब कौतुकास्पद आहे.



### सात हजार जणांची लाईव्ह उपस्थिती

यंदा कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर ५७ वा दीक्षांत समारंभ ऑनलाईन घेण्यात आला. कार्यक्रम विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीवरून थेट प्रक्षेपित करण्यात आला. ६ हजार ९०६ नागरिकांनी हा कार्यक्रम लाईव्ह पाहिला.

### मान्यवरांकडून विद्यापीठाचे अभिनंदन

विद्यापीठाने नॅकच्या पुनर्मूल्यांकनामध्ये ३.५२ सीजीपीए गुणांकनासह 'ए ++' मानांकन मिळविल्याबद्दल सर्वच मान्यवरांनी त्यांच्या भाषणामध्ये विद्यापीठाबद्दल गौरवोद्गार काढले. विद्यापीठाने देशपातळीवर आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

# नवे शैक्षणिक धोरण कौशल्याधिष्ठित पिढी घडवेल

## प्रा. अनिल सहस्रबुद्धे; शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त सोहळा प्रथमच ऑनलाईन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : नव्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल होणार आहेत. यात शिक्षणाचा विचार बाल्यावस्थेपासून केला आहे. विविध क्षेत्रांतील जागतिक संधींना गवसणी घालणारी, उच्चप्रतीची कौशल्ये आत्मसात केलेली आणि राष्ट्रवादी दृष्टिकोन बाळगणारी पिढी घडविणे, हा या नव्या धोरणाचा उद्देश आहे. ही पिढी जागतिक स्तरावर या नव्या भारतीय शिक्षण पद्धतीचे प्रतिनिधित्व करेल, असा विश्वास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी आज व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षान्त







**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षान्त समारंभात मंगळवारी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन करताना राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी व प्रा. अनिल सहस्रबुद्धे. यावेळी (डावीकडून) डॉ. आर. के. कामत, डॉ. पी. आर. शेवाळे, डॉ. विलास नांदविडेकर, डॉ. पी. एस. पाटील, जी. आर. पळसे, डॉ. मेघा गुळवणी.**

समारंभाचे ते प्रमुख पाहुणे होते. त्यांनी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पहिल्यांदाच विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ ऑनलाईन झाला. परीक्षा विभागाचे संचालक जी. आर. पळसे यांनी मिरवणुकीने ज्ञानदंड सभागृहात आणला. कोविड काळात विद्यापीठाने केलेले कार्य, नॅक समितीचे मूल्यांकन आणि वर्षभरातील विद्यापीठाच्या कामकाजाचा आढावा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी घेतला. या वेळी प्रा. सहस्रबुद्धे म्हणाले, ''भारताची अर्थव्यवस्था पाच लक्ष कोटींची होत असताना हे नवे शैक्षणिक धोरण योग्यवेळी आणण्यात आले आहे. यात विद्यार्थ्यांच्या बाल्यावस्थेतील अध्यापनाचाही विचार केला आहे. खेळ, निसर्गरम्य ठिकाणांना भेटी, कथाकथन या माध्यमातून मुलांना मातृभाषेतून शिकविले जाईल. लहानपणापासून त्यांच्यात विविध प्रकारची कौशल्ये विकसित करण्यावर धोरणात भर आहे. या धोरणामुळे उच्चप्रतीची कौशल्ये असणारी आणि राष्ट्रवादी दृष्टिकोन बाळगणारी पिढी तयार होईल.

**पान ११ वर »**

### ही पहिली पदवी ठरावी!

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी म्हणाले, ''जे आज पदवीधर झाले आहेत, त्यांच्यासाठी ही अंतिम नव्हे तर पहिली पदवी असावी. त्यांनी अजून शिक्षण घेऊन अधिक ज्ञान घ्यावे. शिक्षणाचा उपयोग समाजासाठी झाला पाहिजे. शिक्षणाने संकुचितता दूर झाली पाहिजे. प्रांत, भाषा या वादापासून दूर होऊन आपण अधिक उंची गाठली पाहिजे. महापुरुषांचे विचार प्रत्यक्ष अम्लात आणले पाहिजेत. निसर्ग, पर्यावरण, माणूस यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत.''

0 7 APR 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक संस्थांच्या जागतिक क्रमवारीत स्थान मिळण्याची गरज

## अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे चेअरमन डॉ. अनिल सहस्त्रबुद्ध यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

आगामी १५ वर्षात आपल्याला उच्चशिक्षण क्षेत्रातील प्रवेशाचे प्रमाण (जीईआर) ५० टक्क्यांच्या पुढे घेऊन जावयाचे आहे. जगातील आघाडीच्या शंभर शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत भारतीतील किमान दहा संस्थांना स्थान प्राप्त करावयाचे आहे आणि त्या बळावर भारताला एक सक्षम, विकसित राष्ट्र म्हणून प्रस्थापित करावयाचे आहे. त्या दिशेने प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे चेअरमन प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षांत समारंभात मार्गदर्शन करताना राज्यपाल भगतसिंह कोशारी. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस.एस. महाजन, डॉ. पी.आर. शेवाळे, डॉ. मेघा गुळवणी.

शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी होते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पद्धतीने ७७ हजार ५४२ स्नातकांना पोस्टाने पदवी प्रमाणपत्र पाठवण्यात येणार आहे. सात हजार लोकांनी ऑनलाईन दीक्षांत सोहळा पाहिला.

डॉ. सहस्त्रबुध्दे म्हणाले, शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीयस्तरावरील अत्याधुनिक संशोधनात अत्यंत सक्रिय आहे. एकीकडे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे लक्ष्य तर दुसरीकडे आत्मनिर्भर भारत घडविण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने समोर ठेवले आहे. अशा वेळी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण फायदेशीर ठरेल. शैक्षणिक संस्थांनी कुशल मनुष्यबळ तयार करावे. स्वायत्ततेच्या माध्यमातून सर्व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे एकमेकांना सहकार्य करीत समाजाच्या समस्या सोडवतील. पदवी घेतल्यानंतर जागतिकीकरणातील तीव्र स्पर्धेला सामोरे जावे लागेल. सकारात्मक दृष्टिकोन, सहकार्य, ऐक्य व अथक परिश्रमाच्या जोरावर अविरत प्रयत्नाने अस्थिरतेवर मात करावी लागेल. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत म्हणाले, महाराष्ट्र शासन विद्यार्थी हिताच्या उपक्रमांसाठी सदैव शिवाजी विद्यापीठाबरोबर असेल. विद्यापीठाचे सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न सुरु आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कोरोना काळात पोलीस मित्र, आरोग्य मित्र म्हणून प्रचंड काम करुन शासनाला मोलाची मदत केली.

कुलपती भगतसिंह कोश्यारी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या ७७ हजार ५४२ स्नातकांनी पदवी घेतली, याचा मला आनंद आहे. शिक्षणाच्या पुढची पायरी म्हणजे विद्या अगर ज्ञान संपादन ही असते. ज्ञानाचा वापर आपल्या भोवतालचे कल्याण करण्यासाठी करावा. तरुणांनी आत्मनिर्भर बनण्यासाठी महापुरुषांच्या विचाराचे अनुकरण करावे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, आपण शिक्षणाचा फायदा कसा करून घेतो यावर भविष्यकाळ अवलंबून आहे. आपली अंगभूत कौशल्ये, आत्मविश्वास आणि सृजनशीलतेच्या बळावर जगभर विद्यापीठाचे विद्यार्थी प्रशंसनीय कामगिरी करीत आहेत. विद्यापीठाच्या लौकिकात नवीन पदवीधारकांनी मोलाची भर घालून विद्यापीठाचा लौकिक वाढवावा.

प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी पदव्यांचे वाचन केले. धैर्यशील यादव आणि नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनीने पसायदान व राष्ट्रगीत सादर केले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.आर. शेवाळे, आंतरविद्याशाखा विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी उपस्थित होते.

Times of India

# SUK holds convocation online; 77,000 get degrees

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Chairman of All India Council of Technical Education (AICTE) Anil Sahasrabuddhe, while inaugurating the 57th convocation ceremony of the Shivaji University, Kolhapur (SUK) on Tuesday, said the enrolment ratio of students admitted for higher education will have to be increased above 50% in the next 15 years.

He also emphasised on the importance of having at least 10 higher educational institutes in the top-100 global ranking. The convocation ceremony was held virtually and over 77,000 students were awarded degrees, diplomas and certificates.

**Chairman of AICTE Anil Sahasrabuddhe said the enrolment ratio of students admitted for higher education will have to be increased above 50% in the next 15 years**

"We have tough challenges ahead in order to provide quality education to students. The new education policy launched by government has potential to make us a 5 trillion dollar economy and Atmanirbhar Bharat in a truesense," Sahasrabuddhe said.

Chancellor of the university and Governor of Maharashtra Bhagatsinha Koshyari, while addressing the students, said, "Let this degree not be the last one. Education is a continuous process and I hope many will seek higher education. I also appeal to the students to contribute their bit in bringing the pandemic to an end."

Higher and technical education minister Uday Samant said, "The government has always been supportive of the new initiatives of the university. We are soon going to start an university campus to benefit the Marathi students from Maharashtra-Karnataka border districts."

0 7 APR 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी पहिली ठरावी, अंतिम नव्हे

(पान १ वरून)

समारंभात स्नातकांना संबोधित करताना ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. राज्यपाल कोश्यारी म्हणाले, ज्ञान हे मनुष्याला अमर बनविते. ज्ञानाचा वापर भोवतालच्या कल्याणासाठी करणे आवश्यक आहे. मानवासह प्राणिमात्र, निसर्ग व पर्यावरण हितासाठी विद्यार्थ्यांनी जीवन समर्पित करावे. सध्या आपण प्रांतवाद, जातिभेदाने घेरले जात आहोत. स्वतः ला एक मानव अगर भारतीय म्हणून का मानत नाही, हा मोठा प्रश्न आहे.

आपण छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद यांची नावे घेतो. मात्र त्यांचे विचार अंमलात आणत नाही हे खेदजनक आहे. आत्मनिर्भरतेची सुरुवात स्वतःपासून करायला हवी. त्यामध्ये पर्यावरणाचा विचार असायला हवा. विद्यार्थ्यांनी उपलब्ध साधनांचा देशहितासाठी सुयोग्य पद्धतीने वापर केला पाहिजे. केवळ आधुनिकच नव्हे तर अत्याधुनिक बाबतीत अग्रणी असायला हवे. कोरोना संकट पुन्हा ठाकले आहे. सर्व घटकांनी एकजुटीने व दुप्पट जोमाने त्याला हद्दपार करण्यासाठी काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**नवपदवीधरांनी ज्ञानाचा उपयोग वंचित, शोषित घटकांच्या उत्थानासाठी करावा : सहस्रबुद्धे**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे चेअरमन प्रा. अनिल सहस्रबुद्धे म्हणाले, उच्चशिक्षण क्षेत्रातील प्रवेशाचे प्रमाण (जीईआर) पुढील पंधरा वर्षांत ५० टक्क्यांच्या पुढे घेऊन जावयाचे आहे. जगातील शंभर शैक्षणिक संस्था क्रमवारीत देशातील दहा संस्थांना स्थान प्राप्त करून त्या बळावर भारतास सक्षम, विकसित राष्ट्र म्हणून प्रस्थापित करावयाचे आहे. त्या दिशेने विद्यार्थांनी सक्रिय भूमिका बजावण्याची गरज आहे. शैक्षणिक संस्था, विद्यापीठे एकमेकांशी सहकार्य करून समाज समस्या सोडविण्यास हातभार लावतील. नॅशनल रिसर्च फाऊंडेशनच्या स्थापनेमुळे संशोधन गुणवत्ता वाढेल. शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्याधुनिक संशोधनात सक्रिय आहे. स्पर्धात्मक वातावरणात संशोधनासाठी वित्तपुरवठा प्राप्त करण्याची संधी असेल, असेही प्रा. सहस्रबुद्धे म्हणाले.

**शासन सदैव विद्यापीठासमवेत : उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत**

राज्य सरकार विद्यार्थी हिताच्या उपक्रमांसाठी शिवाजी विद्यापीठासमवेत सदैव असल्याचे सांगून उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत म्हणाले, विद्यापीठाने



कोल्हापूर : दीक्षांत समारंभात वार्षिक अहवाल सादर करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत, डॉ. पी. आर. शेवाळे, जी. आर. पळसे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. मेघा गुळवणी.

कार्यक्षेत्रालगतच्या सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्थानासाठी प्रयत्न चालविले आहेत. सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठाने मोठा पुढाकार घेतला ही अभिनंदनीय बाब आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कोरोना साथीच्या काळात पोलिस मित्र, आरोग्य मित्र अशा अनेक भूमिकांतून काम केले. सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले हे कौतुकास्पद आहे. रत्नागिरी आपल्या विधानसभा मतदारसंघात सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलांसाठी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रस्ताव अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे पाठविला आहे. त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तो मंजूर करावा, अशी आग्रही मागणी त्यांनी प्रा. सहस्रबुद्धे यांच्याकडे केली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला. शिक्षण हे जीवनापासून विभक्त करता येऊ शकत नाही. शिक्षणाशी जीवनाचे अभिन्नत्व व एकजिनसीपण सगळ्यांनी समजून घ्यावे. सर्व देशात विद्यार्थी प्रशंसनीय कामगिरी करीत आहेत. विद्यापीठाच्या लौकिकात नवपदवीधारक विद्यार्थ्यांनी मोलाची भर घालून विद्यापीठाचा लौकिक उंचावावा, असे ते म्हणाले.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांच्या नेतृत्वाखाली कुलगुरू कार्यालयापासून राजर्षी शाहू सिनेट सभागृहापर्यंत दीक्षांत मिरवणूक काढण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी पदव्यांचे वाचन केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. पी. आर. शेवाळे, डॉ. मेघा गुळवणी उपस्थित होते.

**शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी महत्त्वाची**

शैक्षणिक धोरण मानवी समस्यांसाठी एकात्मिक, सर्वसमावेशक व संशोधन समाधानास प्रोत्साहन देईल. मात्र याची प्रभावी अंमलबजावणी महत्त्वाची





अनिल सहस्रबुद्धे उदय सामंत

आहे. देशाला तरुण लोकसंख्येचा फायदा घेण्यासाठी सक्षम करेल. शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रेरित करेल, असे प्रा. सहस्रबुद्धे म्हणाले.

**नॅक पुनर्मूल्यांकनात ए++ मानांकन मिळविल्याबद्दल कौतुकोद्गार**

शिवाजी विद्यापीठाने नॅक पुनर्मूल्यांकनात ३.५२ सीजीपीए गुणांकनासह ए++ मानांकन मिळविले आहे. विद्यापीठाने शैक्षणिक, संशोधन, प्रशासकीय दर्जा सिद्ध करण्याबरोबरच विद्यार्थीप्रियता, सामाजिक बांधिलकी या निकषांवर गुणवत्ता सिद्ध केली आहे, याचा अभिमान असल्याचे कौतुकोद्गार राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मंत्री उदय सामंत, प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी भाषणात काढले.

**समारंभात ७७ हजार पदव्या प्रदान; ७ हजार जणांची लाईव्ह उपस्थिती**

कोरोनामुळे ५७ वा दीक्षांत समारंभ ऑनलाईन पद्धतीने घेतला. ७७,५४२ स्नातकांना पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आल्या. विद्यापीठाच्या शिव-वार्ता या यू ट्यूब वाहिनीवरून थेट प्रक्षेपित करण्यात आला. ६ हजार ९०६ नागरिकांनी कार्यक्रम लाईव्ह पाहिला. त्यानंतर दिवसभर हा आकडा वाढत राहिला.

# नवे शैक्षणिक धोरण कौशल्याधिष्ठीत पिढी घडवेल

» पान १ वरून

ही पिढी जागतिक संधींना गवसणी घालेल. तरुणाईच्या इच्छा-आकांक्षा या नव्या शैक्षणिक धोरणात दिसत आहेत. या धोरणामुळे नवी भारतीय शिक्षणपद्धती विकसित होईल. यासाठी नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.''

स्नातकांना शुभेच्छा देताना ते म्हणाले, ''तुम्ही आणि तुमच्या कुटुंबीयांसाठी हा अभिमानाचा क्षण आहे. पदवीधर झाले, ते एका महत्त्वाकांक्षेने उच्चशिक्षणाला सुरवात करतील. सकारात्मक दृष्टिकोन, प्रत्येक संकटाला आत्मविश्वासाने सामोरे जाणे हेच खरे शिक्षण आहे. या गोष्टी साध्य होत नाहीत, तोपर्यंत शिक्षणाचा प्रवास सुरूच राहील. ज्ञानाचा, शिक्षणाचा समाजातील वंचित घटकांना उपयोग होणे, हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे.''

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनीही विद्यापीठाला शुभेच्छा दिल्या. कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी आभार मानले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. पी. आर. शेवाळे, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. एस. एस. महाजन, वित्त व लेखापाल डॉ. व्ही. टी. पाटील, उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.



कोल्हापूर : डॉ. सुबोध प्रभू यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विजय फुलारी आदी.

# दलाई लामा फेलोशिपसाठी डॉ. सुबोध प्रभू यांची निवड

**कोल्हापूर, ता. ६ :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील अॅडजंक्ट प्रोफेसर व मेंदू शास्त्रज्ञ डॉ. सुबोध प्रभू यांची प्रतिष्ठेच्या 'दि दलाई लामा फेलोशिप'साठी निवड झाली. 'न्यूरोलॉजिकल को-रिलेट्स ऑफ बुद्धिस्ट फिलॉसॉफी' यावरील शास्त्रीय शोधप्रबंध ते वर्षभरात सादर करतील.

फेलोशिपबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी अभिनंदन केले. बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांना मिळालेल्या नोबेल पारितोषिकाच्या रकमेतून दरवर्षी आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी एका संशोधकाची फेलो म्हणून निवड केली जाते. यासाठी जगभरातून प्रस्ताव येतात. कोल्हापुरातील ज्येष्ठ न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू यांचे सहकारी म्हणून दशकाहून अधिक काळ रुग्णसेवा केल्यावर डॉ. प्रभू यांनी फ्रान्समध्ये ग्रेनोबल येथे औषधांना दाद न देणाऱ्या आणि मेंदू शस्त्रक्रिया शक्य नसलेल्या फिट्स यावर डी.बी.एस. या नावीन्यपूर्ण उपचार पद्धतीबाबत सहा वर्षे संशोधन केले. यासाठी त्यांना फेडरेशन ऑफ युरोपियन न्यूरो सायन्स सोसायटीज् (फॅन्स) यांची वैयक्तिक ग्रँट मिळाली होती. भारतात परतल्यावर बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी 'बिहेविअरल इकॉनॉमिक्स' विषयाचे सल्लागार म्हणून त्यांनी काम सुरू केले.